महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४९ वा दिनांक : १४/११/२०२४ वार : गुरूवार

## खऱ्या बापाचा असेल तर उत्तर देईल आव्हाडांचा धनंजय मुंडेंना इशारा



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते व मंत्री धनंजय मुंडे यांनी नाशिकच्या सभेत बोलताना जोरदार हल्लाबोल केला होता. जातीपातीचे राजकारण कोण करत आहे, असा प्रश्न उपस्थित करत नाव न घेता त्यांनी शरद पवारांवर टीका केली, तर जितेंद्र आव्हाड यांच्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली, असा आरोपही त्यांनी केला आहे. यावर आता जितेंद्र आव्हाड यांनी पलटवार केला आहे. डॉ. बियाणी यांचा मर्डर कोणी केला? खऱ्या बापाचा पोरगा असेल तर उत्तर देईल, असे म्हणत आव्हाड यांनी हल्लाबोल केला आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, धनंजय मुंडे यांच्याबद्दल बोलायकह झाले तर मी खूप काही बोलू शकतो, त्याला फक्त माझा एकच प्रश्न विचारा, बियाणीचा मर्डर कोणी केला? त्याच्यामागचे कारण काय होते. हिम्मत असेल आणि खऱ्या बापाचा पोरगा असेल तर याचे उत्तर देईल. नाही तर आमच्या एक भगिनी आहेत करुणा मुंडे नावाच्या, त्यांना बाजूला मी घेऊन बसतो आणि त्यांना सांगायला लावतो. जो खुद शीशे के घरो मे रहते हे, वो दुसरो के घरो पर पत्थर नही मारा करते, असे म्हणत आव्हाड यांनी धनंजय मुंडे यांना इशारा दिला आहे.

## पक्ष उभा करण्यास अक्कल लागते, फोडण्यास नाही : शरद पवार





**अहिल्यानगर :** कोणताही पक्ष उभा करण्यासाठी अक्कल लागते, पण तो फोडण्यासाठी काहीच अक्कल लागत नाही, अशा तिखट शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे.

शरद पवार यांची आज अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथे प्रचारसभा झाली. त्यात शरद पवार यांनी राज्यातील फोडाफोडीच्या मुद्यावरून देवेंद्र फडणवीस यांच्यावर सडकून टीका केली. ते म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३०-४० आमदार गोळा केले आणि गुवाहाटीला जाऊन बसले. त्यांनी उद्धव ठाकरे यांचे सरकार पाडले. लोकांना त्यांची भूमिका पटली नाही. हे शिंदे स्वतः देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. उद्धव ठाकरे यांच्याही सरकारमध्ये ते होते. त्यानंतरही त्यांनी बंडखोरी केली.

एखादा पक्ष फोडून सत्ता मिळवणे ही लोकशाही आहे का? देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः आपण ही फोडाफोडी केल्याचे मान्य केले आहे. कोणताही पक्ष उभा करण्यासाठी मोठी अक्कल लागते. पण तो फोडण्यासाठी काहीच अक्कल लागत नाही हे त्यांनी लक्षात घ्यावे.

लोकसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी मी राहुरीला आलो होतो. त्यानंतर तुम्ही आपला उमेदवार निवडून दिला. त्याबद्दल तुमचे आभार. मागच्या लोकसभेला काँग्रेसचा १ व आमचे ४ खासदार होते. पण संविधान संकटात सापडल्यामुळे तुम्ही यावेळी आमचे ३१ खासदार निवडून दिले. आता राज्यात भाजप व आमच्यातल्या फुटून गेलेल्या काही लोकांचे राज्य आहे, असे शरद पवार म्हणाले.

## भाजपने शेतकरी उद्ध्वस्त केला : विजय वडेट्टीवार

**मुंबई :** काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आज महायुती सरकार आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. शेतकरी उद्ध्वस्त करण्याचे पाप भाजपने केले, अशी टीका त्यांनी केली. आज पायाखालची वाळू सरकत असल्याने शेतकरी कर्जमाफीच्या गोष्टी करत असल्याचे ते म्हणाले. भाजपच्या नेत्यांनी कर्नाटक सरकारचे आमंत्रण स्वीकारावे आणि तिथे जाऊन आपले तोंड स्वच्छ करावे, असा टोला विजय वडेट्टीवार यांनी लगावला आहे. अदाणींच्या इशाऱ्यावर महायुतीचे सरकार आले असावे, असेही वडेट्टीवार म्हणाले.

सरकार शेतकऱ्यांच्या शेतमालाला दीडपट-दोनपट भाव दिल्याचे म्हणत आहेत. पण हा भाव कुठे आहे? खोट बोलण्याची देखील एक सीमा असते. ज्यावेळी कापसाचे उत्पादन होते, त्यावेळेला हे कापूस आणि कापसाच्या गाठीची निर्यात करतात. सोयाबीनचे उत्पादन आल्यास सोयाबीन तेल परदेशातून आयात करतात. भाताचे उत्पादन निघाल्यास निर्यात करताना एक्सपोर्टमध्ये २५ ड्युटी लावतात. हे सर्व काय चाललंय? यांना शेतकऱ्याला जगवायचे आहे की नाही? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांना केला आहे.

भाजपने स्वतः शेतकरी विरोधी निर्णय घेऊनही महाविकास आघाडीने शेतकऱ्यांचे वाटोळे केले, असे नाक वर करून सांगत आहेत. उलट महायुतीने, नरेंद्र मोदींच्या सरकारने शेतकऱ्यांचे वाटोळे केले. शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार नाही, असे ॲफिडेव्हिट भाजपच्या सरकारने २०१५ मध्ये सुप्रीम कोर्टात दिले. आज पायाखालची वाळू घसरत असल्याने कर्जमाफी करण्याच्या गोष्टी करत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर महायुतीकडून पुन्हा एकदा जुमलेबाजी सुरू आहे. पण शेतकरी यांना माफ करणार नाही. महाराष्ट्रातील शेतकरी उद्ध्वस्त करण्याचे पाप या लोकांनी केले आहे. १० वर्षांत २० हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. या पापाचे वाटेकरी महायुती सरकार आहे.

## मोदी खोटारड्यांचे सरदार, खोटी आश्वासने देतात अन् सत्तेत आल्यावर जनतेला विसरतात : मल्लिकार्जुन खरगे





**लातूर :** मोदी हे खोटारडे असून त्यांनी दिलेली आश्वासने कधीच पूर्ण केली नाही, अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली आहे. २०१४ च्या निवडणुकीवेळी प्रत्येकाला १५ लाख देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते, पण ते देखील पूर्ण केले नाही. मोदींनी शेतकऱ्यांना धोका दिला. शेतीमालाला दुप्पट भाव देणार असे म्हणाले होते. ज्यांनी हमीभावाची रक्कम वाढवली नाही, ते शेतीमालाला दुप्पट भाव काय देणार, असा घणाघात खरगे यांनी केला. ते लातूर येथे आयोजित प्रचार सभेत बोलत होते.

केंद्र सरकार जे आश्वासन देते ते पूर्ण करत नाही. ही नरेंद्र मोदी यांची सवय आहे. काँग्रेस सरकारने काळा पैसा बाहेर ठेवला आहे. तो परत आणून मी प्रत्येकाला १५ लाख रुपये देईल, असे मोदी म्हणाले होते. पण त्यांनी कुणालाही पैसे दिले नाही. मोदींनी नोकऱ्यांचे आश्वासन दिले. पण तेही पूर्ण केले नाही. पंतप्रधान अशाप्रकारे खोटे बोलतात, ते खोटारड्यांचे सरदार आहेत, अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केली.

निवडणुकीवेळी हे लोक येतात. खोटी आश्वासने देतात. लोकांना फसवतात आणि सत्तेत येतात. सत्तेत आल्यानंतर जनतेला विसरून जातात. मोदींनी शेतकऱ्यांना धोका दिला. शेतकऱ्यांना शेतीमालाला दुप्पट भाव देण्याचे सांगितले. ज्यांनी हमीभावाची रक्कम वाढवली नाही, ते शेतीमालाला दुप्पट भाव काय देणार, असा घणाघात खरगे यांनी केला.

मोदी खरे बोलत नाहीत, तर त्यांचे काय करायला हवे? असा सवाल खरगे यांनी विचारला आहे. मोदी खोटं बोलतात पण रेटून बोलतात. ते खोटारड्यांचे सरदार आहेत, असा हल्लाबोल खरगे यांनी केला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १४ नोव्हेंबर २०२४


## जलवाहिनी अडविली, आंबाळा ग्रामस्थांचा निवडणुकी वर बहिष्कार



**कन्नड (अरुण थोरात):** जलजिवन मिशन जलवाहिनी खोदकामास वन्यजीव विभाग परवानगी देत नसल्याने शंभर टक्के आदिवासी लोकसंख्या असलेल्या आंबाळा ता.कन्नड ग्रामस्थांनी आगामी सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा ईशारा दिला आहे.

याबाबत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार कन्नड यांना निवेदन देण्यात आले आहे.गौताळा अभयारण्याच्या कुशीत वसलेले दुर्गम आंबाळा हे आदिवासी बहुल स्वतंत्र ग्रामपंचायतीचे गाव आहे. एक आदर्श गाव म्हणून ही अलौकिक आहे. तसेच आपल्या शांतताप्रिय एकजूटीतून सलग पाचव्यांदा ग्रामपंचायत बिनविरोध निवडली आहे.

काही चित्रपटांचे चित्रीकरण ही येथे झाले आहे. जलसंधारण कामांत हे गाव आघाडीवर होते. मात्र लोकप्रतिनिधी, प्रशासनाच्या दुर्लक्षा मुळे ग्रामस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. गावास पाणीपुरवठा करण्यासाठी केंद्र सरकार च्या जलजिवन मिशन योजने अंतर्गत पाणीपुरवठा योजना मंजूर झाली आहे.

यासाठी वडनेर पाटबंधारे क्षेत्रात विहिर खोदण्यात आलीय. मात्र विहिर ते गाव दरम्यान वन्यजीव विभागाचे जंगल असल्याने परवानगी अभावी जलवाहिनी चे खोदकाम अडविण्यात आले आहे. परवानगी साठी अर्जफाटे करुण ही वन्यजीव विभाग परवानगी देत नसल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे.

त्यामुळे त्रस्त झालेल्या ग्रामस्थांनी आगामी सर्व निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याचे निवेदन प्रशासनाला दिले आहे. या निवेदनावर नवसिराम मधे, महादू गावंडे, साहेबराव मेंगाळ, भोराजी उघडे, रामचंद्र आगीवले, चीमा गावंडे, शंकर पारधे, रोडामन उघडे, ठकूवाई भुतांबरे, हौशाबाई उघडे, साक्राबाई पोकळे, मनोज मेंगाळ आदी ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

## अपक्ष उमेदवार मनोज पवार यांचा शेतकरी संघटनेत प्रवेश




**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड-सोयगाव विधानसभा मतदार संघांतील अपक्ष उमेदवार मनोज पवार यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटनेत प्रवेश केल्यामुळे प्रस्थापित पक्ष उमेदवारां समोर एक तगडे आव्हान ऊभे राहिले आहे.

अपक्ष मनोज पवार यांनी दि. १२ नोव्हेंबर रोजी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेश कार्यकारणी सदस्य कृषीभुषण भाऊसाहेब थोरात यांच्या हस्ते संघटनेत प्रवेश केला. त्यामुळे, आता तिसऱ्या आघाडी चे कार्यकर्ते कितपत त्यांच्या साठी जोर लावतात. हे पाहणे उत्सुकतेचे ठरेल, समाज सेवी मनोज पवार यांनी आपल्या सामाजिक उपक्रमांतून तालुक्यात आपले भरभक्कम अस्तित्व निर्माण केले आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थकांचा एक मोठा वर्ग त्यांच्या पाठिशी आहे. आता स्वाभिमानी शेतकरी संघटनेतील त्यांच्या प्रवेशामुळे संघटनेची मोठी ताकद ही त्यांच्या पाठिशी उभी राहिली आहे. संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी फोन वरुण संवाद साधत त्यांना पाठिंबा देत असल्याचे जाहिर केले.

या प्रवेश सोहळा प्रसंगी स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे कृषिभूषण भाऊसाहेब थोरात, जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे, गणपत खरे, दिनकरराव पवार, तालुका अध्यक्ष प्रकाश बोरसे, पक्ष तालुकाध्यक्ष रामेश्वर भुसारे, उपजिल्हा अध्यक्ष प्रा. इंगळे, अनिल महाजन, निसार पठाण, गणेश देशमुख, नितीन बारगळ, हतनूर सर्कल प्रमुख बाळासाहेब चोपडे, राजु बोंगाणे, संदीप गायकवाड, बाळाभाऊ कवडे, मुक्तेश्वर नाना, नानासाहेब फौजी, रमेश गायके, सचिन गायके, कृष्णा कवडे, गोरख काकडे, सुदाम जगताप, शिवाजी बचाटे आदि उपस्थित होते.

## औराळा आरोग्य केंद्रात क्षय रोग रुग्णांची तपासणी



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** प्रा.आ. केंद्र औराळा येथे वैद्यकीय अधिकारी डॉ जयदीप झगरे व डॉ प्रतीक्षा राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली टीबी एक्सरे व्हॅन मार्फत क्षय रोग संशयित रुग्णांची तपासणी करण्यात आली त्यावेळी वाहन चालक गिधे साहेब, रहाणे सर आरोग्य सहायक चौधरी सर, परिचर पवार, गुळवे, आशा कार्यकर्त्या महेर, गट प्रवर्तक वारे एक्सरे व्हॅन कर्मचारी आदी उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १४ नोव्हेंबर २०२४


## मला हलक्यात घेतल्याने टांगा पलटी झाला : मुख्यमंत्री शिंदे



**मुंबई** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पालघरमध्ये झालेल्या जाहीर सभेमध्ये जोरदार टोलेबाजी केली. हे दुतोंडी साप आहेत. त्यांनी जनाची नाही पण मनाची लाज ठेवावी. कोणी मायका लाल आला, तरी लाडकी बहीण योजना बंद पडू देणार नाही, असे सांगत मी पोकळ धमक्यांना घाबरत नाही, मला हलक्यात घेतल्यामुळे टांगा पलटी झाला, असा टोला एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीला लगावला आहे.

तसेच विरोधकांचे सरकार येण्याचे सर्व दरवाजे बंद झालेत, असा दावा देखील त्यांनी केला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज पालघरमध्ये जाहीर सभा पार पडली. यावेळी त्यांनी लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांचा समाचार घेतला. सावत्र दुष्ट भावांनी माझ्या लाडक्या बहिणींचा अपमान केला आहे.

लाडकी बहीण योजना बंद पाडण्यासाठी ते कोर्टामध्ये गेले होते. पण कोणी मायका लाल आला, तरी योजना बंद पडू देणार नाही, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. लाडक्या बहिणीसाठी, लाडक्या भावांसाठी, लाडक्या शेतकऱ्यांसाठी मला जेलमध्ये जावे लागले, तरी मी जायला तयार आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला




**छत्रपती संभाजीनगर** : अवलोकितेश्वर प्रॉडक्शन्स निर्मित मराठी चित्रपट माईसाहेब डॉक्टर सविता भीमराव आंबेडकर या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले असून हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचे लेखक प्रसिद्ध नाटककार प्रकाश त्रिभुवन असून यांनीच या चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे.

माईसाहेब आंबेडकर यांच्या बद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही म्हणून विशेष परिश्रम घेऊन संशोधन करून या चित्रपटाची पटकथा लिहिण्यात आली आहे.

या चित्रपटात शैलेश दातार, पल्लवी पालकर, शंतनू मोघे, माधव अभ्यंकर, कमलेश सावंत, अनिल नगरकर, डॉ. विजयकुमार देशमुख, शाहिरा सीमा पाटील यांच्या प्रमुख भूमिका असून औरंगाबाद येथील स्थानिक तसेच महाराष्ट्रातील नामांकित कलावंतांना या चित्रपटात संधी देण्यात आलेली आहे.

नागपूर येथे धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनाच्या दिवशी म्हणजे १२ ऑक्टोबर रोजी या चित्रपटाचे पोस्टर चे पहिले लॉन्चिंग करण्यात आले आहे. माननीय रामदास आठवले साहेब केंद्रीय मंत्री यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला.

याप्रसंगी आठवले साहेब यांच्या हस्ते प्रकाश त्रिभुवन यांचा सत्कारही करण्यात आला असून अवलोकितेश्वर प्रॉडक्शन्सचे कलावंत आणि इतर सामाजिक, राजकीय कार्यकर्ते आणि प्रेक्षक याप्रसंगी उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १४ नोव्हेंबर २०२४


## महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना भाजपचे कायम पाठबळ - आराधना मोना मिश्रा



**मुंबई :** भाजप आणि रा.स्व.संघाची महिलांबाबतची भूमिका कायम अन्यायी राहिली आहे. महिला अत्याचारांबाबत मणिपूर ते मुंबई असा आताचा भाजपचा प्रवास आहे. महिला अत्याचार करणाऱ्यांच्या पाठिशी कायम भाजप उभा रहातो हे उघड सत्य आहे. पुरोगामी महाराष्ट्रातील महिला भाजप आणि शिंदे सरकारला धडा शिकवतील, असे उत्तर प्रदेश विधीमंडळ काँग्रेस पक्ष नेत्या आराधना मोना मिश्रा यांनी म्हटले आहे.

राजीव गांधी भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना आराधाना मिश्रा पुढे म्हणाल्या की, भारतीय जनता पक्षाचा ‘बेटी बचाओ, बेटी पढाओ,’ हा नारा पोकळ घोषणा असून महिलांबद्दल भाजपाचे चाल, चरित्र व चेहरा काय आहे ते सर्वांना माहित आहे. हाथरस असो वा महिला खेळाडू, त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्यांच्या मागे भाजपाचे पाठबळ राहिले आहे. मुंबई शहरात महिला अत्याचारांच्या २०२२ मध्ये ६१७६ गुन्ह्यांची नोंद झाली असून महिलांसाठी सुरक्षित मानले जाणाऱ्या मुंबईतही महिला सुरक्षित नाहीत. महाराष्ट्रातून ६७ हजार महिला बेपत्ता झालेल्या आहेत. काँग्रेस पक्षाने सातत्याने महिला अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला पण भाजपा सरकार काहीच उत्तर देत नाही, असा हल्लाबोल श्रीमती आराधना मोना मिश्रा यांनी केला.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थारोत यांच्या मुलीबद्दल संगमनेरमध्ये भाजप नेत्याने अत्यंत खालच्या पातळीवरची टीका केली, पण त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी जयश्री थोरात व त्यांच्या सहकाऱ्यांवरच गुन्हे दाखल केले. बदलापुरातील आरएसएसच्या शाळेतील लहान मुलींवरील अत्याचाराने महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली, पण या घटनेतही भाजपा सरकारने मुख्य आरोपींना वाचवण्याचेच काम केले. आरोपीचे एन्काऊंटर करून प्रकरण दडपून टाकल्याने या प्रकरणातील खरे आरोपी समोर आलेच नाहीत. जळगावात अल्पवयीन मुलीवर भाजपच्या नगरसेवकाने अत्याचार केले. बनारस हिंदू विद्यापीठात एका विद्यार्थीनीवर भाजप आयटी सेलच्या मुलांनी बलात्कार केला. अशा अनेक घटनांमध्ये भाजपचेच हात बरबटले आहेत. महागाईचा सर्वात मोठा फटका महिलांनाच बसतो, घर चालवणे त्यांना कठीण झाले आहे, उज्ज्वल योजनेचाही फज्जा उडाला आहे, असे मिश्रा म्हणाल्या.

आदिवासी महिलेला राष्ट्रपती केल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सांगत आहेत, पण त्याच महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना अयोध्येतील राम मंदिराच्या उद्घाटनाला बोलावले नाही. नवीन संसद भवनच्या उद्घाटनालाही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना बोलावले नाही, हा फक्त राष्ट्रपती महोदयांचाच नाही तर समस्त महिलांचा अपमान आहे. काँग्रेसने नेहमीच महिलांचा सन्मान केला आहे. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देऊन राजकारणात महिलांचा सक्रीय सहभाग वाढवला आहे. आताही महालक्ष्मी, गृहलक्ष्मी योजनांच्या माध्यमातून काँग्रेस महिला सक्षमिकरणाचे काम करत आहे, असेही आराधना मिश्रा म्हणाल्या.

या पत्रकार परिषदेला अखिल भारतीय काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते सुरेंद्र राजपूत, मीडिया प्रभारी चयनिका उनियाल, मुंबई काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते युवराज मोहिते आदी उपस्थित होते.

## कोकणाचे अदानीकरण होऊ देणार नाही : उद्धव ठाकरे

**मुंबई :** महाराजांनी उभारलेला सिंधुदुर्ग किल्ला अनेक वर्षांनंतरही उभा आहे, पण यांनी उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांना पुतळा एका वर्षात कोसळला. कोकणात जे वाईट सुरू आहे, ते पहावत नाही. कोकणाचे अदानीकरण होऊ देणार नाही, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी भाजपला दिला आहे. केसरकर पडल्यानंतरच सिंधुदुर्गाचे सर्व काही चांगले होईल, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला. ते सावंतवाडी येथे राजन तेली यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत बोलत होते.

भाजपचे लोक काही दिवसांपूर्वी कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग सीमेवर अदाणीच्या गोल्फ कोर्ससाठी जागा शोधत होते, अशी माझ्याकडे माहिती आहे. हे लोक अदानीचे दलाल बनून माझ्या कोकणात येतात, कोकणवासीयांना फसवतात. कोकणवासीयांच्या जागा ओरबाडून अदानीच्या चरणी वाहत आहेत. आपल्या हक्काची मुंबई अदानींच्या घशात घातली. आमचे सरकार आल्यानंतर अदानीच्या घशात घातलेली मुंबई परत काढून घेणार, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. सबका मालिक एक असे साईबाबांनी सांगितले होते. भाजपवाले म्हणतात सबका मालिक अदाणी. माझ्या कोकणाचे अदाणीकरण मी होऊ देणार नाही, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## अजित पवारांच्या पहाटेच्या शपथविधीच्या गौप्यस्फोटावर सुप्रिया सुळेंची प्रतिक्रिया



**मुंबई** :२०१९ विधानसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर सत्तास्थापणेसाठी एका उद्योगपतीच्या घरी झालेल्या बैठकीत अमित शाह, देवेंद्र फडणवीस, शरद पवार साहेब, प्रफुल पटेल यांसह उद्योगपतीही उपस्थित होते, असा गौप्यस्फोट अजित पवारांनी केला होता. यावर सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अशी कोणतीही बैठक झाली याबाबत मला माहिती नाही. पहाटेच्या शपथविधीबाबत आम्हाला कुणालाच माहिती नव्हते, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, त्या बैठकीबद्दल अजित पवारांनाच विचारावे लागेल. अशी बैठक झाल्याची मला माहिती नाही. पहाटेच्या शपथविधीबाबत आम्हाला कुणालाच माहिती नव्हते. हे मी अनेकवेळा बोलले आहे. मला अजुनही तो दिवस आठवतो. मी झोपलेले होते. सदानंद सुळे यांनी मला उठवले आणि टीव्हीवर काय चालले ते बघायला सांगितले. त्यामुळे मला किंवा आमच्या पक्षाला त्या बैठकीबद्दल काहीही माहिती नाही, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले. मीटिंग झाली की नाही? कुठे झाली? काय झाली? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे अजित पवारांनी द्यावीत. आम्हाला काही माहितीच नाही तर आम्ही उत्तर कुठून देणार, असेही त्या म्हणाल्या.

मी गौतम अदानी नव्हे तर रतन टाटा असो वा किर्लोस्कर यांच्यास अनेकांच्या घरी जातो. जे महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्रात काम करू इच्छितात अशांच्या कामांना गती देणे, त्यांच्याशी सुसंवाद ठेवणे या गोष्टी राज्य म्हणून गरजेच्या असतात, असे शरद पवार म्हणाले. तसेच अजित पवारांनी सांगितलेली एकही गोष्ट सत्य नाही, असा खुलास शरद पवारांनी केला.

पाच वर्षांपूर्वी काय घडले, कुठे बैठक झाली, त्यात कोण होते हे सगळ्यांना माहिती आहे. अमित शाह होते, गौतम अदानी होते, प्रफुल पटेल, देवेंद्र फडणवीस मी स्वत: आणि शरद पवारसाहेबही बैठकीत होते, असा गौप्यस्फोट अजित पवार यांनी केला होता. पक्षाचा कार्यकर्ता या नात्याने जे शरद पवार सांगतात, तेच आम्ही पाळत होतो, असा दावा अजित पवारांनी केला. अजित पवार आणि देवेंद्र फडणवीसांचे सरकार ८० तास टिकले, कारण शरद पवारांनी पाठिंबा न देण्याचा निर्णय घेतल्यानंतर बहुतांश आमदार पुन्हा शरद पवारांकडे परतले. त्यानंतर राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेस यांनी महाविकास आघाडी सरकार स्थापन केले.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



# मराठी टंकलेखन उमेदवारासाठी रोजगाराची सुवर्ण संधी

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स, डॉ. बा.आ. म. विद्यापीठ गेट जवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मराठी टायपिंग येणाऱ्या उमेदवाराची आवश्यकता आहे. तरी इच्छुक आणि पात्र उमेदवाराने ८०८७८८०२७४ / ८९५६३६२६४९ या क्रमांकावर संपर्क करावा. (टिप : मराठी टायपिंग व संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक.)